## ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF /AZ /AUR/ 119 / 2008 / 40**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Ashwmedh Heritage Apartment, Dashmeshnagar, Aurangabad. ( Consumer No. 490011149712)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Mrs. Anuja A.Kannadkar of Ashwmedh Heritage Apartment, Dashmeshnagar, Aurangabad. ( Consumer No. 490011149712)

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 26.08.2008 at 11.30 Hrs.**

**Encl As above**.

Copy to :
Mrs. Anuja A.Kannadkar
Ashwmedh Heritage Apartment,
Dashmeshnagar, Aurangabad.

## ग्राहक गा-हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/११९/२००८/४०**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०७/०८/२००८**
**निकाल दिनांक ;- ०४/०९/२००८**

**सौ. अनुजा अंबादासराव कन्नडकर,**
**रा. प-लॅट नं.२, अश्वमेध हेरीटेज अर्पाटमेंन्ट,**
**प्लॉट नं.१९ दशमेशनगर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१११४९७१२)**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,) औरंगाबाद.**

विषयः- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल विनियम २००६) च्या अंतर्गत गा-हाणे.

१) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची-अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ७०/०८/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २६/०८/२००८ रोजी ठेवण्यात आली.

२) ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

अर्जदाराने त्या राहत असलेल्या अश्वमेध हेरीटेज अर्पाटमेंन्ट,दशमेशनगर येथील सर्व प-लॅट धारकाचा संयुक्त (कॉमन) मीटर बाबत तक्रार दाखल केली आहे.या मीटरवर पाण्याचा पंप तसेच संयुक्त वापरात येणा-या ट्युबलाईटचा वीजभार जोडला असुन त्यांनी या मीटरचे बिल नियमीतपणे भरले आहे. दिनांक ०६/०१/२००७ रोजी त्यांचे मीटर बदलण्यात आले व त्याजागी नविन मीटर लावण्यात आले. ऑगस्ट २००७ मध्ये त्यांना ३८०८ युनिट वापराचे एकुण १६४६०/- रूपयाचे वीज बिल महावितरण तर्फे देण्यात आले. त्यांनी महावितरणच्या संबधित कार्यालयात या चुकीच्या बिलाबाबत तक्रार केली असता त्यांच्या तक्रारीचे निवारण न करता त्यांना पार्ट पेमेन्टचा भरणा करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराने मीटर रिडींग प्रमाणे योग्य ते बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

३) दिनांक २६/०८/२००८ रोजी अर्जदार सौ. अनुजा कन्नडकर तसेच महावितरणचे नोडल अधिकारी श्री राठोड उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीवर आपला जबाब दाखल केला. त्यांनी दाखल केलेला जबाबानुसार अर्जदारास देण्यात आलेले ३८७९ युनिट वीज वापराचे बिल हे नऊ महीन्यात विभागुन देण्यात आले असून अर्जदाराचे बिल ४३३१-४१ रूपये कमी करण्याचे मान्य केले व त्याप्रमाणे मान्यता

देण्याची मंचास विनंती केली. नोडल अधिकारी यांनी आपला जबाबात जानेवारी २००८ मध्ये देण्यात आलेले १६१७ युनिट वीज वापराचे बिल कमी करण्याचे मान्य केले पण त्याबाबतचे विवरण त्यांनी दाखल न केल्यामुळे पुढील सुनावणीच्या वेळी ते दाखल करण्याबाबत त्यांना आदेश देण्यात आला व पूढील सुनावणी ०२/०९/२००८ रोजी घेण्याचे निश्चीत करण्यात आली.

४) दिनांक ०२/०९/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार तसेच नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास जानेवारी २००८ मध्ये देण्यात आलेल्या १६१७ युनिट वीज वापराचे विवरण दाखल केले व सदरील बिल हे १६१७ युनिट ऐवजी ४५८ युनिट वीज वापराचे असल्याचे मान्य करून त्या वीज बिलात ७७१७.९४/- रूपये कमी करण्याची तयारी दर्शवीली.अर्जदाराने योग्य बिल न दिलेल्या काळात भरलेल्या पार्टपेमेन्ट ची नोंद घेऊन तसेच चुकीच्या वीज बिलावर व्याज व दंड न आकारता सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली.

५) अर्जदार व नोडल अधिकरी यांनी मंचास दाखल केलेल्या कागदपत्रावरून तसेच सीपीएल चे निरिक्षण केल्यावर असे आढळुन येते की, अर्जदाराचा डिसेंबर २००६ पर्यंत महावितरण कंपनी तर्फे त्यांना देण्यात येणा-या वीज बिलाबाबत कोणता ही वाद नव्हता, अर्जदाराचे १६४५३९ या क्रंमाकाचे जुनेमीटर जानेवारी २००७ मध्ये बदलण्यात आले व त्याजागी१०४०७३४ या क्रमांकाचे नविन मीटर लावण्यात आले. सदरील मीटर बदलीची नोंद घेतली न गेल्यामुळे अर्जदारास जानेवारी २००७ ते ऑगष्ट २००७ या काळात सरासरारीवर आधारीत वीज बिल देण्यात आले.सप्टेंबर २००७ मध्ये त्यांना मागील रिडींग ०००१ व चालू रिडींग ३८७९ अशी दर्शवित त्यांना ३८७८ युनिट वापराचे वीज बिल आकारण्यात आले.त्यांचप्रमाणे जानेवारी २००८ मध्ये मागील रिडिंग ४९१७ व चालु रिडिंग ६५३४ असे दर्शवित १६१७ युनिट वापराचे वीज बिल आकारण्यात आले. सीपीएल वरील जानेवारी २००७ व त्यापुढील रिडिंगचे

अवलोकन केल्यावर अनेक वेळा मीटर चेंज (एमटी-सीएचजी) असा शेरा आढळुन येतो तसेच फेब्रवारी २००८ व त्यापुढील महीन्याची रिडिंग पाहता, जानेवारी २००८ मध्ये घेण्यात आलेली रिडिंग ही चुक असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. अर्जदाराने दाखल केलेली तक्रार योग्य असुन महावितरण वीज कंपनीने त्यांच्या तक्रारीची दखल न घेता त्यांना चुकीची वीज बिल देण्यात आल्याचे आढळुन येते. मंच याप्रकरणी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात आलेली जानेवारी २००७ जुलै २००८ या काळातील सर्व वीज बिले खारीज करण्यात येत आहे.

२) जानेवारी २००७ ते जुलै २००८या १८ महीन्याच्या कालावधीत अर्जदाराचा वीज वापर हा ६८२७ असा आसल्यामुळे त्यांना प्रतिमह ३७९ युनिट वापराचे सुधारीत वीज बिल ३० दिवसाच्या आत देण्यात यावे.

३) वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

४) अर्जदाराने वीज बिलापोटी भरलेल्या रक्कमेची वजावट या सुधारीत वीज बिलातुन करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन ते ग्राहकास व महावितरण वीज कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/११९/२००८/४०** **दिनांक ;-**

**प्रति,**
**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**
**२) सौ. अनुजा अंबादासराव कन्नडकर,**
**रा. प-लॅट नं.२, अश्वमेध हेरीटेज अर्पाटमेंन्ट,**
**प्लॉट नं.१९ दशमेशनगर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१११४९७१२)**

**विषय :-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/११९/२००८/४० गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरील प्रमाणे.

**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**६०६-०८,केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**